नि.फौ.ख.क्र. १४२/२०२३
शासन वि. परमेश्वर व ईतर
**निशाणी क्र. १७**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.१ याची जबानी शपथेवर सुरू**

| | |
|---|---|
| माझे नाव | :- एकनाथ रामभाउ होगे, |
| माझे वय | :- ४९ वर्षे, |
| व्यवसाय | :- शेती, |
| राहणार | :- कोथाळा, ता. मानवत, जि. परभणी. |

---

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.१ यांचा सरतपास श्री. पी. एम. लिहीणे सहा. सरकारी अभियोक्ता यांचे मार्फत :–**

१. मी आरोपी व फिर्यादी यांना ओळखत नाही. मला घटनेबद्दल काही माहिती नाही. मी प्रत्यक्ष घटना पाहिलेली नाही. पोलीसांनी माझा जबाब नोंदवला नव्हता.

**(साक्षीदार अभियोग पक्षास सहाय्य करत नसल्यामुळे सरकारी अभियोक्ता यांनी साक्षीदारास उत्तरसूचक प्रश्न विचारण्याची अनुमती मागितली. त्याप्रमाणे परवानगी देण्यात आली.)**

२. आता मला माझ्या जबाबातील अधोरेखित **भाग–अ** वाचुन दाखवण्यात आला. हे मला आठवत नाही की, तो मी पोलीसांना सांगितला होता किंवा नाही. हे मी सांगु शकत नाही की, सदर मजकुर जबाबात कसा आला. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला वाचवण्याकरीता मी खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास पूर्ण.**

**आरोपीतर्फे त्यांचे विधीज्ञ श्री. आर.एस.बारहाते यांनी उलटतपास नाकारला.**

फेरतपास नाही.

श्रृ. नि. स्वि.,

स्वाक्षरीत/–

ठिकाण : मानवत
दिनांक: ०४/०४/२०२६

**(श्रीमती पी. सी. फटाले)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, मानवत.